## अमेरिकेतलं

# ‘फ्लाय इन्’ गाव!

## दारात गाड्यांच्या ऐवजी चक्क विमानं!

### अद्भुत-अविस्मरणीय!


**एका आटपाट नगरात खूप श्रीमंत लोक राहतात... निमंत्रणाशिवाय तिथे प्रवेश नसतो... इथे प्रत्येकाचे विमान असतं आणि घराला जोडूनच रन वे ही असतो... एका अजब आटपाट नगराची, स्प्रूस क्रीकची ही गजब कहाणी!**

**स्मिता भागवत**

मला जग म्हणजे अनुपम नैसर्गिक आणि मानवनिर्मित अजब रचनांचं वस्तुसंग्रहालय किंवा अजबखाना आहे, असे वाटतं. काही आश्चर्य जगास विनासायास कळतात तर काही आश्चर्यजनक गंमती-जमती फार लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. त्यातही अमेरिकेची ख्याती अपरंपार! जगाच्या कोनाकोपऱ्यातून अनेक प्रवासी अमेरिकेस जातात. कुणी वास्तव्यासाठी तर कुणी पर्यटक म्हणून. पण अमेरिकेतील एका अजब नगरापर्यंत मात्र काही मोजकेच प्रवासी पोहोचू शकले आहेत. कारण ते खाजगी नगर आहे. त्यामुळे त्यावर अमेरिका सरकारची प्रत्यक्ष मालकी नाही. त्यामुळे या नगराचे दरवाजे सर्वांसाठी उघडे नसतात. नगरातील कुणी तुम्हाला आमंत्रित केले तरच तिथे जाता येतं. अशा या नगरात एका लग्नाच्या निमित्ताने जाणं झालं.

हे अजब नगर आहे अमेरिकेच्या फ्लोरीडा प्रांताच्या जवळ. फ्लोरीडाची ख्याती सर्वदूर पसरलेली असली तरी खाजगी मालमत्ता असणारा हा छोटेखानी, भन्नाट परिसर फारसा प्रसिद्धी पावलेला नाही. त्यास गाव म्हणावं की शहर, हा यक्षप्रश्नच! क्षेत्रफळ विचारात घेतलं तर ते गाव ठरेल. पण तांत्रिक विकास आणि आर्थिक समृद्धीचा विचार केला तर त्यास जगातील सर्वाधिक श्रीमंत आणि एकमेव पुरोगामी शहर म्हणावं लागेल.

(पान ५४ वर)



या ‘स्प्रूस क्रीक’ गावात घराघरात अशी विमानं पार्क केलेली असतात

**(पान ४४ वरून...अमेरिकेतलं फ्लाय इन गाव!)**

या नगराचं नाव आहे, स्प्रूस क्रिक!

मालकीची मोटार असणं आता आपल्याकडे नवलाचं ठरत नाही. चार माणसांच्या कुटुंबात तीन मोटारी असणेही हल्ली चकित करत नाही. पण विमान मालकीचं असणं मात्र श्रीमंतांची मिरासदारी वाटते, अगदी अमेरिकेतही! अमेरिकेतही कुणाच्या मालकीचं विमान असल्याचं वा कुणाच्या कुटुंबात मालकीची एकाहून अधिक विमानं असल्याचं कळतं तेव्हा बहुतेकांची बोटं आश्चर्याने तोंडात जातात नि आश्चर्याने उंचावलेल्या भुवया थेट केसांना भिडतात. पण अमेरिकेच्या जवळच असलेल्या या अजब नगराची हीच खासियत आहे.

उत्तर अमेरिकेतील फ्लोरीडा राज्याच्या ईशान्य भागात डेटोना बीचजवळ 'स्प्रूस क्रिक' नावाचं हे छोटेखानी नगर आहे. इथले बरेच लोक खाजगी विमानं बाळगून आहेत. म्हणून या नगरास कौतुकाने 'एअर-पार्क' किंवा 'फ्लाय-इन-कम्युनिटी' ही पदवी प्रदान करण्यात आली आहे. इथली वस्ती आहे फक्त पाच हजार! पण नगरात तेराशे घरं आहेत आणि विमानं सातशे असा कौतुकास्पदच नव्हे तर नवलप्रद प्रकार आहे. ज्यांच्याकडे विमान नाही, ते नजिकच्या भविष्यात विमान घेण्याच्या विचारात असतात. त्यामुळे अमेरिकेत जशी सर्व घरांना निदान एका गाडीच्या पार्किंगची सोय असते, तसंच या खाजगी नगरात प्रत्येक घरास निदान एक विमान पार्क करण्याची सोय उपलब्ध असते. अमेरिकेत इतरत्र गॅरेजमधून गाडी बाहेर काढण्यासाठी 'ड्राईव्ह वे' असतो, तर इथल्या घरांना पार्क केलेले विमान बाहेर काढण्यासाठी धावपट्टी -अर्थात 'रन वे'ची सोय केलेली असते.



**इथल्या बंगल्यांची रचना विमान पार्किंगची सोय लक्षात घेऊन केली जाते**

स्प्रूस क्रीक किंवा फ्लाय-इन-कम्युनिटी या नगरात खाजगी एअरफिल्ड आहे. प्रत्येक ड्राईव्ह वे थेट रन वेला जोडलेला असतो. रनवे चार हजार फूट लांब आणि दीडशे फूट रुंद असतो. संपूर्ण जग या नगरास स्वर्गाची उपमा देते. कारण इथे विज्ञानातील आधुनिक संशोधनाचा महत्तम उपयोग केलेला आहे. इथल्या सामान्यांचं जीवन विमानांशी निगडित असतं. त्यामुळे या नगरात अनेक फ्लाईंग क्लब्ज, प्रायव्हेट एअर क्राफ्टस्, फ्लाईट ट्रेनिंग सेंटर्स आणि चोवीस तासांसाठी सुरक्षा व्यवस्था आहे.

अमेरिकेतील धनाढ्य आसामींना इथे राहायला आवडतं. नामांकित नट आणि पायलट जॉन पार्क ट्रॅवाल्टा काही काळ इथं राहत होता. त्याच्याकडे 'बोईंग ७०७' होतं. त्यामुळे तो येता-जाता होणारा विमानाचा आवाज कानठळ्या बसवायचा. इथे हलक्या-फुलक्या खाजगी विमानांची रहदारी अभिप्रेत असते, त्यामुळे स्वाभाविकच धावपट्टी हलक्या विमानांसाठी तयार केलेली होती. बोइंग ७०७ हे अर्थातच हलकं फुलकं विमान नाही. या जबरदस्त विमानाच्या येण्या-जाण्यामुळे तीव्र आवाज होणं स्वाभाविक होतं. या त्रासदायक ध्वनिप्रदूषणाबद्दल इथल्या नागरिकांनी तक्रारही केली. शिवाय हलक्या-फुलक्या विमानांसाठी असलेल्या धावपट्टीवर बोईंग ७०७ विमानाचं वजन वारंवार पेलण्याची वेळ आली तर धावपट्टीची अपार झीज होईल, याकडेही लक्ष वेधण्यात आलं. या समस्येकडे दुर्लक्ष करता येणार नव्हतं. म्हणून जॉनला तशी समजही देण्यात आली. परिणामी तो फार काळ इथं राहू शकला नाही.

टॉम क्रूझ आपल्या गर्लफ्रेंडला घेऊन काही काळ इथं राहिला होता. निकोल किडमॅनचे 'डेज ऑफ थंडर' या चित्रपटाच्या शुटिंगच्या निमित्ताने काही काळ इथे वास्तव्य होतं.

सामान्यपणे इतक्या छोट्या नगरात विमानतळाची सोय नसते. पण या अजब नगराची निर्मिती होण्यामागे अनोखा इतिहास कारणीभूत आहे. या भूमीत करुण सत्याच्या अनेक कथा-व्यथा लपल्या आहेत. इतिहास आणि ऐतिहासिक संशोधनाच्या अभ्यासकांना हा परिसर हिस्टॉरिकल टेस्टामेंट (ऐतिहासिक करार) वाटतो. दोनशे वर्षांपूर्वी इथं एक भव्य कबरस्थान होतं. कबरींच्या मुख्य दगडावर 'स्मिथ' कुटुंबाचा करुण अंत झाल्याची व्यथा कोरलेली होती. राज्यातील अंतर्गत लढाईत कामी आलेल्या कित्येक सैनिकांना इथे चिरविश्रांती मिळाली. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत घडलेल्या करुण घटनांचा इतिहास इथं दफन करण्यात आला आहे. डावीकडे या कुटुंबातील जन्मदाते आणि तरुण वयापर्यंत पोहोचण्यापूर्वीच मरणास शरण गेलेल्या सहा बालकांना तर उजव्या बाजुस पंधरा नवजात बालकांना इथं दफन केलं आहे. या नगराच्या जनकाने या ऐतिहासिक कारुण्यावर मात करण्याच्या प्रयत्नात या परिसरावर पसंतीची मोहोर उमटवली. अर्थात जादुची कांडी फिरावी तशी ही निर्मिती अचानक वा पटकन झालेली नाही. झालं असं की....

डेटोना बीचच्या परिसरात छोटे-मोठे खडे नसलेली अत्यंत मृदू मुलायम वाळू आहे. त्यामुळे हा भाग सपाट केल्यास इथे चाकं वेगाने फिरतील, म्हणजेच मोटारी सहज धावतील, असा तर्क करण्यात आला. म्हणून १९०० साली इथे कार रेसिंगसाठी रस्त्याची निर्मिती करण्यात आली. पाठोपाठ एका कुशाग्र बुद्धीच्या वैमानिकास तिथे सहजपणे विमान उतरवता येईल, असंही वाटलं. अमेरिकन प्रजेची मानसिकता कृतीशील, प्रयोगशीलही! त्यामुळे मनात विचार येण्याचा अवकाश, की तो त्वरित अंमलात आणण्याचा त्यांचा खाक्या! त्यामुळे लगेच रनवे निर्मितीची व्यवस्था झाली. (Hangars) पण विमानघर बरेच नंतर तयार झाले. वॉरन ब्राऊनने लिहिलेल्या फ्लोरीडाच्या उड्डाण इतिहासात या बीचवर चार्ल्स हॅमिल्टनने १९०६ साली इस्रायलचं ग्लायडर यशस्वीपणे उतरवलं, अशी नोंद आहे. हा पल्ला गाठण्यास त्याला खूप कष्ट घ्यावे लागले. या प्रयत्नात अनेकदा त्याची ढोपरं फुटली. तरी तो नामोहरम झाला नाही. प्रथम त्याला ग्लायडर दीडशे फूट उंच उडवून खाली उतरवण्यात यश मिळालं. मग



घरासमोर पार्क केलेलं विमान
जेवढं फॅन्सी, तितकी त्या घराची
श्रीमंती अधिक

त्याने अडीचशे फुटाचा पल्ला गाठला. त्याच्या यशस्वी प्रयत्नाने अनेकांना प्रेरणा मिळाली. १९११ साली जॉन मॅकर्डी नावाच्या वैमानिकाने इथे विमान उतरवले. तो परवानाधारक वैमानिक होता. जॉन मॅकर्डीच्या पाठोपाठ १९१२ मध्ये फिलिप्स पेज आणि १९१३ साली रुथ यांनी हा पराक्रम केला. फिलिप्सने तर डेटोना बीचवरील हॉटेल क्लॅरेंडोनच्या आसपास घिरट्या घालणाऱ्या विमानाचे फोटो घेतले. पुढे विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात डेटोना बीच व्यतिरिक्त ओल्ड ऑर्चार्ड बीच (Orchard beach) वर अटलांटिक महासागराच्या दुसऱ्या टोकाच्या पाच ठिकाणांहून येणारी विमानं उतरू लागली. पण १९२९-३० च्या हिवाळ्यात हा विमानतळ बंद पडला आणि तेव्हापासून हॅलिफॅक्स नदीवरील बेथून पॉईंटवर विमानं उतरू लागली. पुढे पूर्वेहून येणाऱ्या परवानाधारक विमानांनी टॅम्पा आणि ऑरलँडो येथे टपाल पोहोचवण्याची व्यवस्था केली.

डेटोना बीचवर १९३० साली बील लिंडसे यांच्या व्यवस्थापनाखाली 'फ्लोरीडा स्टेट एअरवेज इनकॉर्पोरेशन' स्थापन झाले. पण बिल लिंडसे यांचं निधन झाले, त्यामुळे या परिसरात नैराश्य दाटलं आणि या संस्थेचं काम बंद पडले. मग जणु ही व्यवस्था चालू होणं आणि बंद पडण्याचं चक्रच सुरू झालं. पुढे विश्वयुद्धाची शक्यता निर्माण झाली. तेव्हा मात्र विश्वयुद्ध झाल्यास विमानतळाची सोय असावी, असा विचार झाला. म्हणून डेटोना बीचवर प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आलं. त्याचा खूप उपयोग झाला. पण दुसरं विश्वयुद्ध संपलं आणि या परिसराचा मालकी हक्क परत करण्यात आला. विश्वयुद्धामुळे प्रचंड मंदी निर्माण झाली होती. त्यामुळे मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देणं आवश्यक होतं. स्वाभाविकच इथल्या हालचाली मंदावल्या. तेव्हा रहदारीवर नियंत्रण ठेवणारे ट्रॅफिक कंट्रोल टॉवर निर्माण होऊन आधुनिक म्हणता यावे असे विमानतळ तयार होण्यास फार काळ जावा लागला.

**वेणा अजब नगराच्या निर्मितीच्या**

दुसऱ्या विश्वयुद्धाच्या काळात मॅककिन्ले कॉन्वे (McKinley Conway) नावाचा उत्साही वैमानिक विमानांच्या तपासणीचे काम करत असे. तो Aeronautical and Electrical engineer होता. त्याचं तांत्रिक ज्ञान अनुपम होतं. तरी त्याच्या मनात अधिक संशोधनाची भूक होती. म्हणून विश्वयुद्ध संपताच त्याने स्वतःला संशोधनाच्या कामात झोकून देण्याचा निर्णय घेतला. त्या कार्यासाठी त्याने अटलांटा (Atlanta) परिसरावर पसंतीची मोहोर उमटवली आणि एक इंजिन असलेल्या सेकंडहँड विमानाची खरेदी केली. त्या विमानाच्या मदतीने त्याने समग्र उत्तर अमेरिका पालथी घातली. आकाशातून प्रवास करताना त्याला मोटार प्रवासात रहदारीमुळे निर्माण होणारे अडथळे जाणवले. अडथळ्यांमुळे गंतव्यस्थानी पोहोचण्यास होणारा उशीर आणि त्यामुळे दाटणारा वैफल्ययुक्त वैतागही आठवला आणि त्याच्या मनात भन्नाट कल्पना जन्मली. ट्रॅफिक जॅममुळे येणारा वैताग टाळायचा असेल तर प्रवास रस्त्यावर नव्हे तर आकाशात केला पाहिजे, असं त्याच्या मनाने घेतलं. हा विचार वास्तवात कसा उतरवता येईल, याचा तो गंभीरपणे विचार करू लागला. विविध पैलू विचारात घेऊन तो परिणामांच्या शक्यता तपासू लागला. तसं करताना आपसूक त्याच्या मनात एका स्वप्नील नगराची निर्मिती आकार घेऊ लागली. त्या नगरात तो आपलं विमान टॅक्सी असल्यागत उपयोगात आणत होता. पाहता पाहता हे स्वप्न त्याचं ध्येय बनलं. लगेच त्याने विचारास कृतीची जोड दिली.

नुकतंच युद्ध संपल्यामुळे सरकारकडे विमानांचा अपार भरणा झाला होता, हे त्याच्या चाणाक्ष नजरेने टिपले. इतक्या साऱ्या विमानांची सरकारला गरज नाही, खरं तर इतकी विमानं सांभाळण्याचा खर्च सरकारला झेपत नसल्याचं त्याच्या सुजाण नजरेनं टिपलं. परिणामी त्याच्या मनात 'इंडस्ट्रीयल पार्क' आणि 'फ्लाय इन्'ही कल्पक योजना खेळू लागली. त्यास अभिप्रेत असलेली विमानं स्थानिक सरकारच्या अखत्यारीत होती. अशा विविध विमानांचे फोटो घेऊन त्याने नीट योजना तयार केली. सातव्या दशकाच्या उत्तरार्धात आणि आठव्या दशकाच्या सुरुवातीस त्याने 'फ्लाय इन' संकल्पनेचा प्रसार केला. तसं करताना तो योग्य सरकारी अधिकाऱ्यांच्याही संपर्कात होता. फ्लाय इन् संकल्पनेच्या ध्येय पूर्तीसाठी त्याने केप केनेडी येथे कार्यशाळा घेतली. त्या संदर्भात आलेल्या अनुभवांचा धांडोळा 'दि एअरपोर्ट सिटी' या पुस्तकाच्या रुपाने त्याने जगासमोर मांडला. हे सव्यापसव्य करत असतानाच तो आपलं ध्येय कुठे पूर्ण करता येईल, याचाही विचार करत होता. त्यासाठी योग्य स्थान शोधताना, डेटोना बीच नजीकच्या एका परिसराने त्यास भुरळ घातली.

पण अनेक करुण घटना घडल्यामुळे या परिसरास नैराश्याची कळा आली होती. पण आपल्या ध्येयाने या औदासीन्यावर मात करावी, असं त्यास वाटलं. लगेच त्याने कंबर कसली. त्याचं हे कार्य सहज सर्वांच्या गळी उतरावं इतकं सामान्य नक्कीच नव्हतं. तरी त्याने या अजब नगरीचा जन्मदाता बनण्याचा निश्चय केला. क्रियाशील वैमानिकाच्या अथक परिश्रमाने तो तडीसही नेला. 'केल्याने होत आहे रे परंतु आधी केलेची पाहिजे' या उक्तीचं हे उत्तम उदाहरण आहे. मॅक कॉन्वेचं मन रेसिडेन्शियल एअर पार्क निर्मितीचं स्वप्न बघत होते. डेटोना बीच


प्रतिक्षा कन्स्ट्रक्शन
इंजि. दत्तात्रय बी. म्हेत्रे
कन्सलटींग इंजिनिअर आणि कॉन्ट्रॅक्टिंग
लक्ष्मीनगर, बुधगाव, मो. ९५७९२२२९९०
Email Id: mhetredattatray@yahoo.in




नजीकच्या स्थानाचा इतिहास–भूगोल विचारात घेऊन त्याने एक आराखडा तयार केला. संत वा कवीच द्रष्टे असतात असं नाही, खरा वैज्ञानिकही द्रष्टा असतो. भविष्यात निर्माण होऊ शकणारा परिसर कल्पनेत बघण्याचे सामर्थ्य असलेला! उदास कबरस्तानात त्याला स्वप्ननगरी दिसू लागली. स्वप्नील सोयींनी सज्ज असलेले अत्याधुनिक नगर! त्या नगरात मालकीचं विमान बाळगणाऱ्या आधुनिक श्रीमंतांची घरं असणार होती.

दरम्यान दुसरं महायुद्ध संपलं होतं. त्यात अपार पडझड झाली होती. ते नुकसान विचारात घेऊन गरजेस प्राधान्य देत अमेरिकेने पुनर्बांधणी सुरू केली होती. गरजा श्रीमंतांच्या सोयींवर मात करत होत्या. सर्वत्र जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली होती. फ्लोरीडा राज्याचं महत्त्व घटलं होतं. मॅक कॉन्वे यास आपली योजना मांडण्यासाठी ही वेळ अत्यंत योग्य वाटली. पसंत पडलेला परिसर खाजगी मालमत्तेच्या रुपात विकत घेऊन आपण तिथे 'फ्लाय– इन् नगर' उभारू इच्छितो, असे त्याने योग्य अधिकाऱ्यांना कळवले. आपणास सक्षम प्रजेचं सहकार्य असल्याने, सर्वांच्या सहकार्याने आपणही स्वप्ननगरी साकार करण्यास समर्थ आहोत, असा त्याचा दावा होता. योजनेस हिरवा कंदील मिळतो की नाही ते बघत मॅक निष्क्रिय बसून नव्हता. तर त्याच्या द्रष्ट्या सुजाण नजरेने तो आर्थिक गुंतवणूक करणारे आणि नावीन्याची आवड असलेले धनाढ्य टिपत होता, आणि आत्मविश्वासाने त्याची 'एअर पार्क'योजना विविध श्रीमंतांच्या गळी उतरवत होता. त्याचा दांडगा आत्मविश्वास पाहून सरकारी अधिकारी थक्क झाले. त्यांनी तातडीने मॅकची भेट घेतली. मॅककडून मोठ्या रकमेची हमी घेऊन त्यांनी १९६९ साली त्याच्या योजनेस हिरवा बावटा दाखवला.

योजना मंजुर होताच वेगाने काम पूर्ण होईल इतकं काही ते सोपं काम नव्हतं. समग्र योजना सरकारी कायद्याच्या चौकटीत बसवायची तर आधी योग्य कार्यकारिणी निर्माण करणं भाग होतं. या समग्र योजनेचा निर्माता या नात्याने मॅक कॉन्वॉय यास कार्यकारिणीच्या अध्यक्षस्थानी अधिकृतपणे विराजमान करणं आवश्यक होते. तसं केल्यावर त्याने आधीच संपर्क साधलेल्या श्रीमंत गुंतवणूककारांना पाचारण करण्यात आले. त्यांच्या आर्थिक सहकार्याने नियोजित परिसराची खरेदी करण्यात आली. सर्वानुमते या योजनेस Fly-in concept नाव देण्यात आले. समग्र योजनेची नीटस बांधणी आणि ती मंजूर होऊन विशिष्ट परिसराची कायदेशीर हस्तांतरणाची व्यवस्था होईतोवर जुलै महिना उजाडला. हस्तांतरण आणि नवीन योजनेचं झोकात उद्घाटन झालं. गुंतवणूकदार, मॅकचे पायलट मित्र आणि इतर हितचिंतक अशा सर्वांनी उद्घाटनाची फित कापण्याचा विधी संपन्न केला. मग खऱ्या अर्थाने स्वप्ननगरीची निर्मिती सुरू झाली.

वास्तविक विश्वयुद्ध संपताच १९४६ नंतर खुद्द सरकारने अशा रेसिडेन्शियल पार्कच्या ६००० संकुलांची भव्य योजना आखली होती. पण सरकारी नियमांच्या काचणाऱ्या चौकटी आणि तळ दाखवणारी सरकारी तिजोरी, यामुळे सरकारची विशाल योजना पुढे सरकली नाही. याउलट मॅकची योजना आटोपशीर होती. तो शिस्तीचं महत्त्व जाणणारा! तरी त्यास सरकारी नियमांच्या सक्त चौकटींचा अतिरेकी काच नव्हता. त्यामुळे कामाची गती संथ असली तरी त्याची योजना पुढे सरकत होती. खाजगी गुंतवणूकदारांनी मॅकला चांगला प्रतिसाद दिल्यामुळेही सरकारी योजनेस फटका बसला.

मॅकच्या इच्छेनुसार ही संकल्पना मार्गी लागली. सक्षम श्रीमंत लोक सकाळी विमान उडवून इथे येत. मासेमारीची मौज लुटून त्याच सायंकाळी परतत! पण हे फार काळ जमू शकलं नाही. व्हिएतनाम युद्धाच्या रुपाने अमेरिकेची आर्थिक डबघाई सुरू झाली. त्यात तेल समस्येची भर पडली. अमेरिकेवर नैराश्याची छाया पसरली. आठव्या शतकाच्या मध्यावर गुंतवणूकदारांची मदत असूनही मॅकला या नगराचा खर्च परवडेनासा झाला. त्याला दिवाळं जाहीर करावं लागलं. तेव्हा 'थॉम्पसन प्रॉपर्टीज इन्कॉर्पोरेशन' या संस्थेने विमानतळाच्या १४०० एकर जमिनीचा ताबा घेतला आणि काम पुढे नेण्याची व्यवस्था केली. या नव्या मालकाने मॅकचं स्वप्न पूर्ण करण्याचा चंग बांधला.

थॉम्पसन प्रॉपर्टीज इन्कॉर्पोरेशनने 'स्प्रूस क्रीक' परिसराचा मास्टर प्लॅन तयार केला. आधुनिक विमानतळ, कंट्री क्लब, क्लब हाऊस, टेनिस कोर्टस्, १८ होल्स असलेला चँपिअन गोल्फ कोर्स, आधुनिक रेस्टॉरंटस् इ. मॅकच्या स्वप्ननगरीत होते ते सारे काही या परिसरात प्रत्यक्ष साकारण्याचा पराक्रम त्यांनी केला. म्हणून आज इथे नगरजनांच्या बंगल्याच्या पार्किंग प्लेसमध्ये पाईपर, पी ५१ मुस्टांग, एल – ३९, एलब्रेट्रोज, एन एक्लिप्स ५००, फ्रेंच फौगा मॅजिस्टर अशी विविध प्रकारची विमानं डौलात उभी दिसतात. सोबत आलिशान लॅम्बोर्गिनी, कार्वेट्स, पोर्से २ सारख्या किंमती गाड्या नगराची शोभा वाढवतात. आता इथे विशेष विकाऊ जागा शिल्लक नाही. इथले सुंदर हॉल्स लग्न आणि इतर प्रकारच्या समारंभासाठी उपलब्ध करून देण्यात येतात. अशा समारंभात आमंत्रण मिळावं, अशी सामान्य नागरिकांची तीव्र इच्छा असते, त्यासाठी लोक जिवाचं रान करण्यातही संकोच मानत नाहीत. कारण तसं निमंत्रण हाच या खाजगी नगरीत प्रवेश करण्याचा एकमेव परवाना असतो. शेवटी 'याचि डोळा याचि देही' स्वर्ग बघायची इच्छा कुणाला नसते? कवी द्रष्टे असतात, त्यांनी स्वर्ग ही संकल्पना कल्पनेत बघितली. पण मॅक आणि थॉम्पसनसारख्या क्रियाशील द्रष्ट्या धुरंधरांनी ती प्रत्यक्ष साकार केली. खरंच हे नगर स्वर्गीय समृद्धी आणि सौंदर्याचा एकमेवाद्वितीय नमुना आहे.